ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 9 | ISSUE - 2 | OCTOBER - 2022

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# पितळखोरे लेण्यांमधील शिलालेखांचे पुराभिलेखीय अवलोकन



**डॉ. रुपाली मोकाशी**
**सहयोगी प्राध्यापक , विभाग प्रमुख , पदव्युत्तर इतिहास,**
**आर के तलरेजा महाविद्यालय , उल्हासनगर .**

**मुख्य शब्द** : पितळखोरे, बौद्ध लेणी, शिलालेख

**प्रस्तावना:**

प्राचीन भारतात सर्वप्रथम लयन स्थापत्याची सुरुवात आपल्याला बिहार मधील बाराबार गुंफा येथे झाल्याची दिसून येते. मौर्य सम्राट अशोक आणि त्याचा नातू दशरथ यांनी आजीवक पंथाच्या भिक्षूंसाठी या लयन स्थापत्याची निर्मिती केली. यानंतर महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर बौद्ध लयन स्थापत्याची निर्मिती झालेली आपल्याला दिसून येते. पितळखोरे येथील बौद्ध लेणी यांची निर्मिती ही लयन स्थापत्याच्या पहिल्या टप्प्यात झालेली आहे.

पितळखोरे येथील बौद्ध लेणी औरंगाबाद जिल्ह्यातील सातमाळा पर्वतरांगांत कोरविली आहेत. (२०°१५’ N; ७५°१५’ E) एकूण १४ लेण्यांचा हा समूह प्राचीन भारतातील लयनस्थापत्याच्या पहिल्या टप्प्यातील आहे. सह्याद्री पर्वतरांगांतील इतर लेणी समूहांप्रमाणे या लेण्यादेखील पश्चिमेकडील सोपारा व भडोच सारखी प्राचीन बंदरे आणि उत्तरेकडील उज्जैन सारख्या नगरांना जोडणाऱ्या प्राचीन व्यापारी मार्गावर निर्माण केल्या असाव्यात. पितळखोरे हे टॉलेमीने वर्णन केलेले ‘पेट्रीगल’ आणि ‘महामायुरी सूत्र’ या बौद्ध ग्रंथात वर्ण केलेले ‘पितंगलय’ हे शंकरी नावाच्या यक्षाचे स्थान असावे.

लयनस्थापत्याच्या महायान काळात येथे नवीन स्थापत्य निर्माण झाले नाही मात्र बुद्धाच्या भित्तीचित्रांचे अवशेष दिसतात. येथील ‘भारवाहक यक्ष, द्वारपालांची जोडी, पंख असलेल्या अश्वांची जोडी, बाह्यभागावरील हत्तींची मालिका या विशेष मूर्ती आहेत. भारतातील इतर लयनस्थापत्याप्रमाणे येथेही लेण्याच्या बांधणीत सहभाग असणाऱ्या दानकर्त्यांचे शिलालेख कोरलेले आहेत. तत्कालीन धर्म, समाज आणि राजकीय परिस्थिती यांना जाणून घेण्यासाठी हे कोरीव लेख हे एक अमुल्य साधन आहे.

प्रस्तुत लेण्यांमध्ये एकूण ११ कोरीव लेख आहेत. पैकी ७ लेखांची नोंद बर्जेस व इंद्रजी यांनी केली आहे आणि १९५९ मध्ये प्रसिद्ध केलेल्या उत्खनन अहवालात एम एन देशपांडे यांनी ४ नवीन लेखांची नोंद केली आहे. सर्व लेख ब्राह्मी लिपी आणि प्राकृत भाषेमध्ये कोरलेले आहेत. एकाही लेखामध्ये कालनिर्देश नाही.

परंतु अक्षरवाटिकेच्या आधारे हे लेख इसवी सन पूर्व दुसरे शतक ते इसवी सनाचे पहिले शतक या काळात कोरलेले असावेत.

गजपृष्ठाकार छत आणि चैत्यगृहात (गुंफा क्र. ३) ३७ साध्या अष्टकोनी स्तंभांची काहीशी आतल्या दिशेने कललेली मालिका आहे. पैकी मुख्य द्वाराकडून उजव्या रांगेतील १० आणि ११ व्या स्तंभांवर दानकर्त्यांनी नोंद केली आहे. प्रस्तुत चैत्यगृह अजंठा येथील प्राचीन लेणे क्र १० च्या समकालीन असावे असे बर्जेस यांचे मत आहे. स्तंभ क्र. १० ही प्रतिष्ठानच्या मितदेव याची देणगी होती. [पतिठाणा मितदेवस गाधिकस कुलस (थबो) दानं] बर्जेस यांच्या मतानुसार या लेखातील अक्षरे अशोकालीन ब्राह्मी लिपीशी साधर्म्य दाखवतात. मितदेव स्वतःची ओळख 'गन्धिक कुळातील' अशी करून देतो. टॉलेमी याने 'ज्यॉग्रफी' या ग्रंथात प्रतिष्ठान ही सातवाहन राजा पुळूमावी याची राजधानी असल्याची नोंद केली आहे. 'पेरिप्लस ऑफ एरिथ्रियन सी' या ग्रंथात लिहिल्याप्रमाणे येथून बॅरिगॅझा [भडोच] येथे व्यापार चालत असे. देश परदेशीतील व्यापारामुळे सातवाहन काळात सुबत्ता होती. सुगंधी द्रव्यांचा व्यापार याचेच निदर्शक आहे. कार्ले येथे देखील चैत्यगृहाच्या व्हरांड्यात उजवीकडे धेनुकाकट येथील गन्धिक सिंहदस याच्या दानाची नोंद आहे.

स्तंभ क्र. ११ ही प्रतिष्ठानच्या सघकच्या मुलाने दिलेली देणगी होती. [पतिठाना सघकस पुतान थबो दानं] या दानकर्त्याने स्वतःचे नाव आणि व्ययसाय याबद्दल काहीच माहिती दिली नाही. या दोन्ही लेखांमधील अधिक चिन्हाप्रमाणे असलेला 'क' किंवा इंग्रजी उलट्या 'व्ही' प्रमाणे 'ग' हे अक्षर लेखांची प्राचीनता दर्शवते.

लयनस्थापत्याच्या पहिल्या टप्प्यात निर्माण झालेल्या इतर लेण्यांत सातवाहन आणि शक राजवंशाचे लेख दिसून येतात. पितळखोरे येथे या राजांचे लेख नाहीत. मात्र याच लेण्यामधील विविध लहान खोल्यांच्या भिंतींवर कोरलेले चार लेख राजवैद्य मगिल आणि त्याच्या कुटुंबियांचे आहेत. मगिल हा वच्छि याचा पुत्र होता. स्वतःस राजवैद्य म्हणवणारा मगिल हा तत्कालीन महत्वाच्या राजघराण्याच्या सेवेत असावा. अशाच प्रकारे नण्ण वैद्य याने कान्हेरी येथे आणि वैद्य इसिरखित आणि त्याचा पुत्र वैद्य सोमदेव यांनी कुडा येथे दान दिल्याचे ब्राह्मी शिलालेखांत नोंद केले आहे. मात्र मगिल प्रमाणे हे वैद्य स्वतःस राजवैद्य म्हणवत नाहीत.

चैत्यगृहाच्या शेजारील क्र. ४ च्या लेण्यातील छोट्या खोल्यांच्या भिंतींवर हे चार शिलालेख कोरलेले आहेत. नागराजू यांच्या मते या लेखांतील अक्षरवाटिका विशेषतः लंबाकार इकार आणि चौरस 'स' आणि 'ह' ही काहीशी नंतरच्या काळातील दिसते. पैकी पहिला लेख भग्न आहे. त्यातील 'मगिल' याचे दान इतकेच वाचता येते. [......त्रस मगिलस दानं]. दुसऱ्या लेखातील 'राजवज' म्हणजेच राजवैद्य इतकीच अक्षरे उरली आहेत. तिसऱ्या आणि चौथ्या लेखांत मगिल याची मुलगी 'दता' आणि मुलगा 'दतक' यांची दाने कोरलेली आहेत. [राजवेजस वच्छिपुतस (म)गिलस दहुतु दताय दानं] [राजवेजस वच्छि(पुतसम)गिल स पुतस दतकस (दानं)]


एम. एन. देशपांडे यांनी नव्याने केलेल्या उत्खननात चार नवीन शिलालेख प्रकाशात आले. अक्षरवाटिकेच्या आधारे हे लेख इसवी सन पूर्व दुसऱ्या शतकातील असावेत. यातील दोन लेख गुंफा क्र. ४ मध्ये आहेत. पैकी पहिला लेख डावीकडच्या अर्धस्तंभावर कोरलेला आहे. हा स्तंभ एका भिक्षुणीने दान दिला होता. [---य भिछुनिया दानं थ(भो)]

याच गुंफेमध्ये पंख असलेल्या घोड्याच्या शिल्पावर एक लेख आहे. [(धे)नुकटस समसपुतेन कण्हेन कत] हे दान कण्ह या समस याच्या पुत्राने दिले आहे. या लेखात देखील दानकर्त्याविषयीची अधिक माहिती नाही मात्र आवर्जून केलेला त्याच्या धेनुकाकट या गावाचा उल्लेख विशेष आहे. या गावाचा निश्चित ठावठिकाणा समजत नाही. मात्र धेनुकाकट हे इसवी सनाच्या सुरुवातीच्या काळातील एक महत्वाचे व्यापारी केंद्र असावे. कार्ले

येथील चैत्यगृहातील स्तंभांवर धेनुकाकटच्या पंधरा दानकर्त्यांची नावे कोरलेली आहेत. त्यातील सहा यवन आहेत. शेलारवाडी येथे धेनुकाकटच्या (धेनुकाकडे) नंद याचे दान नोंदले आहे.

या नवीन उत्खननादरम्यान एक भारवाहक यक्षाची मूर्ती सापडली होती. त्याच्या डोक्यावर एक पात्र आहे आहे आणि मुद्रेवर एक गूढ स्मित आहे. या मूर्तीच्या डाव्या तळव्याच्या मागील बाजूस ब्राह्मी लेख कोरला आहे. त्यात हि मूर्ती कण्हदास या हीरणकाराने (सोनार) केली असल्याचा उल्लेख आहे. [कण्हदासेन हीरणकारेन कता]

गुंफा क्र. ५ समोर पडलेल्या एका दगडावर एक खंडित लेख आहे त्यानून फारसा अर्थबोध होत नाही. [.....यठ अथिसेनिया] ठिसूळ दगडामुळे पितळखोरे येथील लेण्यांची बांधणीपश्चातच पडझड सुरु झाली होती हे येथील प्राचीन काळातील जीर्णोद्धारावरून दिसून येते. तशातच चैत्य लेणे क्र. ३ आणि लेणे क्र. ४ येथील स्तंभांची बरीच पडझड झाली आहे. त्यामुळे अजूनही काही शिलालेख नष्ट झाल्याची शक्यता आहे.




पतिठाणा सघकस पुतान थबो दानं




(भग्न) .... तुस मगिलस दानं



राजवे ------स (भग्न)



राजवेजस वछिपुतस मगिलस (दानं)



राजवेजस वछिपुतस मगिलस दहुतु दताय दानं



राजवेजस वछिपुतस मगिलस पुतस दतकस दानं

(यथादृष्ट प्रती-Burgess James and Indraji Bhagwanlal, Inscriptions from the Cave Temples of Western India)



पतिठाणा मितदेवस गाधिकस कुलस (थभो) दानं

(Wikimedia Commons)

## संदर्भ

- Burgess James and Indraji Bhagwanlal, Inscriptions from the Cave Temples of Western India, Government Central Press, 1881
- Deshpande Brahmanand, Yaksha Worship in Ancient Maharashtra, Annals of the Bhandarkar Oriental Research Institute, Vol. 91 (2010), pp. 91-104
- Deshpande M N, The Rock Cut Caves of Pitalkhora in the Deccan, Ancient India, 1959, pp. 66-93

- Fergusson James and Burgess James, The Cave Temples of India, Oriental Books Reprint Corporation, Delhi, 1969, pp. 269-273
- Nagaraju S., Buddhist Architecture of Western India, Agam Kala Prakashan, Delhi, 1981
- Epigraphia Indica Vol – X, H Luders, Appendix to Epigraphia Indica vol.10 (no. 1187-1193)
- Qureshi Dulari, Rock Cut Temples of Western India, Bharatiya Kala Prakashan, Delhi, 2010